## FIRST INFORMATION REPORT

**Form : 1-A**

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No. 0046276

1. * Dist. / जिल्हा: गडचिरोली  * P.S. / पोलीस ठाणे: पेरमिली  *Year / वर्ष: 2024  *FIR No. / पहिली खबर क्र.: 01/2024  *Date / तारीख: 5/1/2024

2. (i) *Act / अधिनियम: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988  *Sections / कलमे: 7

(ii) *Act / अधिनियम: —  *Sections / कलमे: —

(iii) *Act / अधिनियम: —  *Sections / कलमे: —

(iv) *Other Acts & Sections / इतर अधिनियम व कलमे: —

3.(a) *Occurence of Offence : / अपराधाची घटना  *Day / वार: गुरुवार  *Date from / तारीख पासून: 4/1/2024  *Date To / तारीख पर्यंत: —

*Time Period / वेळेचा अवधी ............  *Time From / पासून: 17/37 वा  *Time To / पर्यंत: 21/22 वा

(b) Information received at P.S.Date / पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख: 05/01/2024  *Time / वेळ: 05/00 वा

(c) General Diary Reference Entry No. (s) / सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक: 04/2024  *Time / वेळ: 05/00 वा

4. Type of information : / माहितीचा प्रकार: लाच रक्कमेची मागणी करून स्विकारल्या बाबत  *Written / Oral : / लेखी/तोंडी: लेखी

5. Place of Occurrence : / घटनेचे ठिकाण (a) * Direction and Distance from P.S. / पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर ............ Beat No. / गस्तक्षेत्र क्र. ............

(b) *Address: / पत्ता: वनपरीक्षेत्र अधिकारी जेंगकर यांचे शासकिय फॉरेस्ट क्वार्टर पेरमिली मु. पो. पेरमिली, ता. अहेरी, जिल्हा - गडचिरोली.

(c) *In case outside limit of this Police Station, then the / या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. / पोलीस ठाणे: —  Dist.: / जिल्हा: —

6. Complainant /Informant : / तक्रारदार / खबरी

(a) Name / नाव: श्री. अंकित वरगंटीवार

(b) Father's/ Husband's Name / पित्याचे / पतीचे नाव: मनोज वरगंटीवार

(c) Date/Year of Birth : / जन्म तारीख / वर्ष: 32 वर्ष,  (d) Nationality : / राष्ट्रीयत्व: भारतीय

(e) Passport No. : / पारपत्र क्र.: —  Date of Issue : / दिल्याची तारीख: —  Place of Issue / दिल्याचे ठिकाण: —

(f) Occupation : / व्यवसाय: कंत्राटदार

(g) Address : / पत्ता: मु. पो. ता. एटापल्ली, जि. गडचिरोली

K1326/K-1327

Scanned with CamScanner

नक्कल लेखी फिर्याद

दिनांक
०५/०१/२०२४

नांव :– श्री. अंकित मनोज वरगंटीवार, वय ३१ वर्षे, व्यवसाय– कंत्राटदार मु.पो. ता. एटापल्ली जि. गडचिरोली मो. क्र. ८०८०१०३५९६, ९४०४३०३०७९, ७२७५४४४०१०

मी दिनांक ०४/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री. श्रीधर भोसले यांना फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार दिनांक ०४/०१/२०२४ रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले हे शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा नागेपल्ली जि. गडचिरोली येथे १५.१० वा. पोहोचले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी स्कारपीओ चारचाकी वाहन क्र. MH33 A 9277 ने मौजा नागेपल्ली जि. गडचिरोली येथे हजर होतो. त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प नागेपल्ली येथे आज दिनांक ०४/०१/२०२४ रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहत असून सुमारे ०५ वर्षापासून श्री मोरेश्वर कुनघाडकर यांचे सोबत त्यांच्या हाताखाली मी ठेकेदारीचे काम करतो.

मौजा तुमरगूंडा ते कासमपल्ली पर्यंत २९ किलोमीटरचे रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम एम.एस. वालीया अॅन्ड ब्रदर्स, गोंदिया यांचे नावे टेंडर मिळाले. मार्च २०२२ मध्ये एम.एस. वालीया अॅन्ड ब्रदर्स, गोंदिया यांचेकडून श्री. मोरेश्वर कुनघाडकर, गव्हर्नमेंट सिव्हील कांट्रॅक्टर यांचेसोबत सदर कामाबाबत करार झाले. मी श्री. मोरेश्वर कुनघाडकर यांचेकडे कामाची देखभाल करण्याकरीता सहकारी म्हणून काम पाहतो. सदर रस्त्याचे खडीकरणाचे काम पुर्ण होवून डांबरीकरणाचे काम व रोडच्या साईडला मुरूम भरण्याचे काम सुरू आहे. दि. ०२/०१/२०२४ रोजी तुमरगूंडा ते उडेरा गावाच्या दरम्यान अंदाजे १४:०० वा. सुमारास रोडच्या कडेला जेसीबीच्या साहाय्याने काढून टाकलेले मुरूम ट्रॅक्टरच्या साहाय्याने लेवल करत असतांना वनरक्षक राऊत साहेब व इतर दोन वन कर्मचारी हे त्या ठिकाणी आले व त्यांनी मला ''तुम्ही डांबरी रोडच्या कडेला टाकलेली मुरूम व माती ही जंगलातून काढून आणला आहे. तुमच्यावर फाईन होईल असे बोलुन आरएफओ जेनेकर साहेबांना भेटा असे सांगून कामावरील सपाटीकरणाची ट्रॅक्टर सोबत घेउन गेले व ट्रॅक्टर वन परिक्षेत्र कार्यालय गुरूपल्ली येथे लावुन ड्रायव्हर संजय बिश्वास यांना सोडून दिले व पुढील काम बंद करण्यास सांगीतले. त्यावरून मी दि. ०३/०१/२०२४ रोजी अंदाजे रात्रो ८:०० वा. सुमारास पेरमीली येथील कार्यालयात गेलो असता, आरएफओ जेनेकर यांनी मला ''तुमच्यावर ७२ लाख रूपयाची फाईन बसते. मी ७२ लाख रूपयाचा फाईन कमी करून ५ लाख रूपयापर्यंत फाईन करतो, त्याकरीता मला तुम्ही १० लाख रूपये दया, असे बोलले. तेव्हा मी त्यांना एवढी रक्कम सध्या माझेजवळ नाही, पैशाची व्यवस्था करून आपणांस भेटतो असे बोललो असता श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ साहेब यांनी दि. ०४/०१/२०२४ रोजी आलापल्ली येथील क्वाटर्स मध्ये १० लाख रूपये आणून दे, असे म्हणून मला पैशाची मागणी केली. तेव्हा मी घाबरून त्यांना एवढी रक्कम सध्या माझेजवळ नाही, पैशाची व्यवस्था करून आपणांस भेटतो असे बोललो असता श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ साहेब यांनी दि. ०४/०१/२०२४ रोजी आलापल्ली येथील क्वाटर्स मध्ये १० लाख रूपये आणून दे, असे म्हणून मला पैशाची मागणी केली.

श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ पेरमीली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नसुन अथवा भांडण नाही तसेच कोणतीही आर्थीक देवाण घेवाणचे व्यवहार नाहीत. परंतु श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ साहेब यांनी मला मौजा तुमरगुंडा ते कासमपल्ली रस्त्याचे कामावरील पकडलेली ट्रॅक्टर सोडण्याकरीता व ७२ लाख रूपयाची फाईन कमी करून ५ लाख रूपयाची फाईन करण्याकरीता १० लाख रूपये लाच रक्कमेची मागणी केली असून त्यांना १०

Scanned with CamScanner

**Form : 1-B**

7. Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

No. 0046276

श्री. प्रमोद आनंदराव जेनेकर वय. ३८ वर्षे, धंदा- नोकरी, पद- वनपरीक्षेत्र अधिकारी, वनपरीक्षेत्र कार्या. पेरमिली ता. अहेरी जि. गडचिरोली.

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |

| *Deformities/Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit(s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| | | | | | |

| * Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.



Scanned with CamScanner

लाख रूपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले १० लाख रूपये हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे.

त्यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री श्रीधर भोसले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर संदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. १०,००,०००/– (रू. ५००/– दराच्या २००० चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा कं. १ मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कारवाई करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ १७.३७ वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच कं. १ यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच कं. १ यांचेसह श्री प्रमोद जेनेकर, आरएफओ पेरमिली यांना भेटण्यास फॉरेस्ट क्वाटर्स आलापल्ली येथे मी आणलेल्या चारचाकी वाहन क्र. MH33 A 9277 ने पाठविण्यात आले. तेव्हा श्री. प्रमोद जेनेकर आरएफओ हे फॉरेस्ट क्वाटर्स आलापल्ली येथे हजर मिळून आले. व त्यांनी मला मौजा तुमरगुंडा ते कासमपल्ली रस्त्याचे कामावरील पकडलेली ट्रॅक्टर सोडण्याकरीता व ७२ लाख रूपयाची फाईन कमी करून ५ लाख रूपयापर्यंत फाईन करण्याकरीता १० लाख रूपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन तडजोडअंती ५ लाख रू. लाच रक्कम मौजा पेरमिली येथील त्यांचे राहत असलेल्या क्वाटर्समध्ये स्विकारण्याची तयारी दर्शविली व आमचे ठेकेदार श्री. मोरेश्वर कुनघाडकर यांस सोबत येण्यास सांगितल्याने मी पंच कं. १ सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच कं. १ यांच्या आवाजाचा नमुना घेउन व्हॉईस रेकॉर्डर १८.०१ वा. बंद करून श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर माझी अंगझडती घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंच कं. १ व २ यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र. १ यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ यांनी मला मौजा तुमरगुंडा ते कासमपल्ली रस्त्याचे कामावरील पकडलेली ट्रॅक्टर सोडण्याकरीता व ७२ लाख रूपयाची फाईन कमी करून ५ लाख रूपयापर्यंत फाईन करण्याकरीता १० लाख रूपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन तडजोडअंती ५ लाख रू. लाच रक्कम मौजा पेरमिली येथील त्यांचे राहत असलेल्या क्वाटर्समध्ये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ यांनी तडजोडीअंती ५ लाख रूपयाची मागणी केल्याने मला पंचासमक्ष अँथ्रॅसिन पावडर लावलेली १० लाख रूपयापैकी ०५ लाख रूपये लाचेची रक्कम मला परत देण्यात आली. व उर्वरीत ५ लाख रूपये लाच रक्कम एका लिफाप्यात ठेवले. यानंतर माझी सापळापुर्व अंगझडती घेउन मला व पंच क्र. १ यांना सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार श्री. प्रमोद जेनेकर यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर क्वाटर्सच्या बाहेर दर्शनी भागी येवून डोक्यावरून हात फिरवावे असा इशारा करण्याबाबत व मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर मौजा नागेपल्ली येथून श्री. प्रमोद जेनेकर हे राहत असलेल्या फॉरेस्ट क्वाटर्स पेरमिली येथे लाच रक्कम देण्याकरीता मी आणलेल्या चारचाकी वाहनाने सापळा पथकासह निघालो व श्री. श्रीधर भोसले साहेबांनी पेरमिली गावाच्या अलीकडेच

Scanned with CamScanner

8. Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

**Form : 1-C**

No. 0046276

पोस्टेला येवून

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :
① लाच रक्कम - 5,00,000/- रु. ② घर झडती दरम्यान मिळालेली रक्कम - 85,000/- रु. ③ एक विवो कंपनीचा मोबाईल जु.वा.कि. 10,000/- रु. ④ एक रेडमी कंपनीचा मोबाईल जु.वा.कि. 7000/- रु. ⑤ एक सॅनडिस्क कंपनीचा 32GB मेमरी कार्ड कि. 00/- रु.

10. *Total value of properties stolen/involved : एकूण - 6,02,000/- रु.
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ):
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) : घटना ता. वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार यास मौजा-तुमरगुंडा ते कासमपल्ली रस्त्याचे कामावरील पकडलेली ट्रॅक्टर सोडण्याकरीता व 72 लाख रु. ची फाईन कमी करुन 5 लाख रुपया पर्यंत फाईन करण्या करीता आलोसे श्री. प्रमोद आनंदराव जेनेकर वय 38 वर्ष, धंदा-नोकरी, पद- वनपरीक्षेत्र अधिकारी, वनपरीक्षेत्र पेरमिली, ता. अहेरी, जिल्हा गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन रु. 10,00,000/- (दहा लाख रुपये) लाच रक्कमेची पंच साक्षीदार समक्ष सुस्पष्ट मागणी केली व आपले पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायद्या करीता वाम व भ्रष्ट मार्गाने तडजोडी अंती 5,00,000/- रु (पाच लाख रुपये) लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात मिळून आले

13. Action taken: Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed* ......... Rank......... to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S. ......... on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले श्री श्रीधर भोसले पदनाम पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. गडचिरोली यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर ......... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.
F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही
*Name : योगेश संजय महाजन
नाव
*Rank : पोउपनिरी No. \
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : दि. 5/1/2024
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

K-1326/K-1327.

Scanned with CamScanner

थांबवून लाच रक्कम ५ लाख रूपये ठेवून असलेला लिफापा फाडून त्यातील ५ लाख रूपये लाच रक्कम कापडी पिशवीमध्ये ठेवून माझेकडे दिली व लाच रक्कम देण्याकरीता मला, पंच क्र. १ व मोरेश्वर कुनघाडकर यांचेसह श्री. प्रमोद जेनेकर आरएफओ हे राहत असलेल्या फॉरेस्ट क्वाटर्स पेरमीली येथे वेळ २१:०६ वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डीग मोडवर ठेवून व्हाईस रेकॉर्डर माझे बनियानचे आतमध्ये लटकवून ठेवून मला मी आणलेल्या चारचाकी वाहन क्र. MH33 A 9277 ने रवाना केले. त्याचवेळी सापळा पथक हे त्यांचे वाहनाने माझे मागोमाग आले. मी पंच क्र. १ व मोरेश्वर कुनघाडकर यांचेसह फॉरेस्ट क्वाटर्स पेरमीली येथे गेलो असता, गैरअर्जदार श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ हे हजर मिळुन आले. तेव्हा गैरअर्ज़दार श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ यांनी माझेसोबत व श्री. मोरेश्वर कुनघाडकर सोबत कामासंबंधी बोलणी करून ''नसते आले तरी काही विषय नव्हता, असे म्हणून उजव्या हाताच्या बोटाने ईशारा करून लाच रक्कमेची मागणी केल्याने मी त्यांना '' आता पाचच आणलो, मोजून घ्या असे बोलल्यानंतर त्यानी राहु दया, असे म्हणून कामासंबंधी बोलणी करून अंदरच्या रूममध्ये बेडच्या खाली लाच रक्कम ठेवण्यास सांगितल्याने मी ५ लाख रूपये लाच रक्कम अंदरच्या रूममधील बेडच्या खाली ठेवलो. त्यानंतर मी पंच क्रं. १ सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास डोक्यावरून हात फिरवण्याचा ईशारा करून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. व त्यानंतर पंच क्रं. १ यांच्या आवाजाचा नमुना घेउन व्हॉईस रेकॉर्डर वेळ २१.२५ वा. बंद केले व नंतर माझी अंगझडती घेण्यात आली तसेच लाच रक्कम ५ लाख रूपये, शासकीय क्वाटर्समध्ये मिळून आलेले ८५,०००/– रूपये व नमुद कारवाईतील मेमोरी कार्ड, विवो कंपनीचा १ व रेडमी कंपनीचा १ असे २ मोबाईल हे श्री. प्रमोद जेनेकर, आरएफओ यांचेकडुन पंचासमक्ष जप्तीपत्रका प्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. त्याबाबत सदर सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी पंचनामा क्रं. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी श्री. प्रमोद आनंदराव जेनेकर, वय ३८ वर्षे, पद– वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र पेरमिली यांनी मला मौजा तुमरगुंडा ते कासमपल्ली रस्त्याचे कामावरील पकडलेली ट्रॅक्टर सोडण्याकरीता व ७२ लाख रूपयाची फाईन कमी करून ५ लाख रूपयापर्यंत फाईन करण्याकरता १० लाख रूपये लाच रक्कम मागणी करुन तडजोडअंती ५ लाख रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही/इंग्रजीत अस्पष्ट
( श्रीधर भोसले )
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.विभाग, गडचिरोली.

सही/इंग्रजीत अस्पष्ट
( अंकित मनोज वरगंटीवार )

Scanned with CamScanner